# बी.एस.जी. पुढाऱ्यांची मार्गदर्शीका

बी.एस.जी. पुढाऱ्यांची मार्गदर्शिका, बी.एस.जी. (बायबल अध्ययन समुह / गट ) मध्ये पुढाऱ्यांना मदत करणे आणि त्यांना मार्गदर्शन व्हावे यासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. संपर्कात असणाऱ्या विश्वासूना शिष्य बनविण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो. बायबल अध्ययनाचा उद्देश विश्वासणाऱ्यांना प्रत्येक दिवशी प्रार्थना करण्यासाठी वेळ देणे आणि त्यांना आपल्या विश्वासात दृढ कसे करणे या साठी आपणाला मदत करते. पवित्रशास्त्र मनन करणाऱ्या समुहाचे / गटाचे पुढारीपण करण्याचे कोणतेच योग्य किंवा अयोग्य असा मार्ग नाही, परंतू ह्या मार्गदर्शिकाचा उपयोग एक मार्गदर्शक म्हणून करु शकतो. आम्ही तुम्हाला प्रोत्साहित करतो की,तुम्ही तुमच्या क्षेत्राात मार्गदर्शन आणि निर्देश देणाऱ्या आत्म्याच्या शोधात असणे. कारण तुम्ही तुमच्या क्षेत्रामध्ये बी.एस.जी.(बायबल स्टडी ग्रूप )चा अभ्यासक्रम लागू करु शकता.

**उद्देश :-**

बी.एस.जी.(बायबल स्टडी ग्रूप )चा उद्देश परमेश्वराच्या लोकांना वय्यक्तिकपणे परमेश्वराच्या वचनाचे मनन करण्यास चांगल्या प्रकारे सुसज्जीत करणे.कारण ते परमेश्वरा बरोबर वय्यक्तिक आत्मिक संबध स्थापीत करून त्याने आपला विकास करावा.आणि परमेश्वराच्या इच्छेनुसार आपले प्रदर्शन करावे.

**बी.एस.जी चा उद्देश**
**चार मुख्य उद्देश आहेत :-**

**१.परमेश्वरा बरोबर जवळीकता (घनिष्ट संबंध)**
**योहान.१५:५ , होशेय.६:६, इफिस.३:१६, गलती.२:२०**
बी.एस.जी. परमेश्वरा बरोबर संबंध स्थापित करण्यास महत्व देते.
हा आपमच्या अस्तित्वाचा मुख्य उद्देश आहे.

**२. बायबल संबधी अभ्यास.** **२तिमथ्य.३:१६**
विश्ववसणाऱ्यांना बी.एस.जी.चा अभ्यासक्रम उपयोगात आणून त्यांना बायबल अध्ययन कसे करावे हे शिकवले जाते.ज्याच्या द्वारे विश्वासणाऱ्यांना प्रशिक्षण मिळते.
**निरिक्षण** - (बायबल काय सांगते ?)
**अर्थ लावणे याख्या** :-( याचा अर्थ काय आहे ?)
**लागूकरण** :- (आज माझ्या जिवनाचा अर्थ काय आहे ?)

**३.एक दुसऱ्यावर अवलंबून राहणे (परपस्परावलंबी)** **योहान.१३:१५, रोम. १२:१५,१करिंथ.१२:२६-२७, कलस्सै.१:१८**
बी.एस.जी.च्या प्रमुख कार्यातून हे एक आहे की, येशू ख्रिस्ताच्या अधिनतेमध्ये राहून एक देहाच्या (शरिर) रूपाने कसे कार्य करणे याचे महत्व शिकविणे, आणि आमच्या दैनंदीन जिवन शैलीत याचा उपयोग कसा होतो.




**४. सुवार्ता प्रसार करणे.** **मत्तय.२८:१९-२०**
विश्वासणाऱ्यांना उत्तेजन देणे की,जे काही त्यांनी आपल्या अध्ययनाच्या द्वारे शिक्षण घेतले आहे ते त्यानी अविश्वासी लोकांना सांगणे आहे. आणि विश्वासणाऱ्यांना हे पण शिकवणे आहे की,शब्दाच्या द्वारे आणि कार्याच्या द्वारे सुवार्ता प्रसार कशा प्रकारे करणे.

वधस्तंभाच्या चित्रात बी.एस.जी.चे चार उद्देश दाखवले आहेत. त्याचे लक्ष हे आहे की,विश्वासणाऱ्यांनी परमेश्वराच्या इच्छेनुसार जिवन कशा प्रकारे जगावे हे शिकविले आहे.चारही उद्देश परस्परांशी जोडलेले आहेत.आणि आपल्या दैनंदीन जीवनात लागूकरण करण्याची आवश्यकता आहे. **दोन उभे उद्देश** परमेश्वराशी जवळीकता आणि बायबल अध्ययन. हे मुख्यत:हा परस्परांशी सबंधीत आहेत. **दोन आडवे उद्देश** एक दुसऱ्यावर अवलंबून आणि सुवार्ता सांगणे यांच्याशी संबंधीत आहेत. दोघंचाही उद्देश एकच आहे.एक दुसऱ्या बरोबर संबंध कशा प्रकारे ठेवावे यावर आधारीत आहेत. सर्व चारी उद्देशांचा केंद्र बिंदू **येशू ख्रिस्त** आहे. आणि त्यांना एकदुसऱ्या पासून वेगळे करू शकत नाही.

**चारही उद्देश आवश्यक आहेत आणि ते आपण एक दुसऱ्याच्या सहकार्या शिवाय (मदत) करू शकत नाही.**

- बायबल अध्ययना **शिवाय** परमेश्वराशी जवळीकता :- परमेश्वराचे उद्देश ,योजना आणि त्याच्याप्रती आपले ज्ञान मर्यादीत असेल. (२ तिमथ्य.३:१६).
- परमेश्वराच्या जवळीकते **शिवाय** बायबल अध्ययन :- रुढीवाद, अपयश / निष्फळता (होशे.६:६ ; योहान.१५:५ ).

- परस्परावलंबी **विना** सुवार्ता :- शब्दा विना वस्तू ''तुमची एकमेकांबरोबर प्रीती असली म्हणजे त्या वरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहा ''(योहान.१३:१५ ; रोम.१२:५ ;करिंथ.१२:२६-२७ ;कलस्सै.१:१८ ).
- सुवार्ता **विना** परस्परावलंबी :- आराम करणाऱ्या छोटया मंडळया परमेश्वराचे लोक यांच्या प्रती आपले कार्य पुर्ण करू शकत नाही. (मत्तय.२८:१९-२०).

**बी.एस.जी.कसे काम करते.**

हाऊस चर्चमध्ये विश्वासणाऱ्यांना शिष्य बनविण्यासाठी बी.एस.जी. अभ्यासकमाचा एक मुख्य साधन म्हणून उपयोग होतो. विश्वासणाऱ्यांना शिस्तबद्द आणि सेवेचे कार्य करण्यासाठी बायबल अध्ययन सामुग्री आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून बी.एस.जी.च्या चार उद्दिष्टांमध्ये त्यांना सुसज्ज केले जाते.

बी.एस.जी. आपल्या क्षेत्रामध्ये शिष्य बनविण्याचे प्रशिक्षण आणि सुवार्ता प्रसार या कार्यक्रमाची जबाबदारीने **देखरेख करतात.** आपल्या संपर्कात असलेले पुढारी आणि विश्वासी यांना कसे प्रशिक्षीत करावे हे शिकण्यासाठी त्यांना बीएसजी प्रशिक्षणाच्या कार्यक्रमा मध्ये सहभागी झाले पाहीजे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून पुढाऱ्यांना विशेषता हे शिकविले जाते की,विश्वासणाऱ्यांचे याजकपण, आणि आत्मिक विकासाची उन्नती करण्यासाठी अभ्यास. आणि पुढाऱ्यांना शिस्तवद्ध होण्याच्या संदर्भत जी एस.सी.पी.ची जी मुल्ये **(देवाबरोबर घनिष्ट नातेसंबंध , पवित्र आत्म्याच्या फळामध्ये वाढणे , कृपेची साक्ष सांगणे , पवित्र आत्म्यांच्या दानाचा सराव , आपल्या जिवनाचे कारभारीपण )** आहेत, त्याचा सहयोग कसा केला जाईल. त्यांना सिद्यांत्त आणि धर्मशास्त्र विज्ञानातील सत्य या बद्दल शिकविले जाईल. त्यांचा विश्वासात पाया मजबूत (भक्कम ) तयार व्हावा यासाठी ह्या सर्व गोष्टी आवश्यक आहेत. आमची आशा आहे की,एकमेकांनी एकमेकांच्या सहभागीते मध्ये वेळ व्यतीत करून नियमितपणे संपर्कात राहणे.आणि पाठपुरावा करून एकमेकांचा विकास करण्यासाठी बी.एस.जी.च्या पुढाऱ्यांना प्रशिक्षीत आणि सुसज्य केले जाईल. यांच्या द्वारे ते आपल्या नेटवर्क (संपर्कामधील ) मधील विश्वासणाऱ्यांचे चांगल्या प्रकारे देखरेख करतील.

## बी.एस.जी.चे आयोजन कशा प्रकारे करणे ?

**बायबल अध्ययन सामुग्री (साहित्य )**

बायबल अध्ययन साहित्याचा उद्देश हा आहे की, विश्वासणाऱ्यांनी परमेश्वराचे वचन प्रत्येक दिवशी मनन करणे आणि परमेश्वराच्या इच्छेनुसार जीवन व्यतीत करण्यासाठी शिकणे आहे.प्रत्येक शास्त्रभागाचे विभाजन सहा दिवसात केले आहे. प्रथम पाच दिवस शास्त्रभाग वाचणे आहे आणि त्या शास्त्रभागावर आधारीत असणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देणे आहे. सहाव्या दिवशी त्या शास्त्रभागाचे अधिक स्पष्टीकरण होते. एक महत्वपुर्ण गोष्ट म्हणजे प्रतिदिवशी शास्त्रभाग वाचण्यापुर्वी परमेश्वराची वक्तीगत भेट घेणे, आणि त्याच्या बरोबर वेळ व्यतीत करणे यासाठी की,परमेश्वर काय सांगतो हे समजून घेण्याचा प्रयत्न करणे. सातवा दिवस हा समुहाचा (गटाचा)सभा घेण्याचा दिवस आहे.

शास्त्राचे वाचन घरात किंवा शांत ठिकाणी केले गेले पाहीजे.विश्वासणाऱ्यांनी आठवढयातून एक वेळा एकत्रीत आले पाहीजे. आणि एकदुसऱ्याच्या प्रती जबाबदार असले पाहीजे.

**समुहाचे (गटाचे) पुढारी :-**

प्रत्येक गटामध्ये एक पुढारी असला पाहीजे.तो पुढारी गटाला मार्गदर्शन करणारा मेंढपाळ असेल. हे पुढारी महत्वाचे असतात, कारण ते आपल्या गटातील लोकांना शिस्त लावतात. हे पुढारी प्रत्येक आठवडी आपल्या गटातील लोकांनी प्रार्थना करावी यासाठी त्यांच्या संपर्कात राहतात, आणि त्यांच्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी त्यांना मदत करतात, त्यांना शास्त्रभाग वाचण्यासाठी प्रोत्साहीत करतात, आणि लोक परमेश्वरा बरोबर कशा प्रकारे चालत आहेत याचा अनूभव घेण्यासाठी त्यांच्या सपर्कात राहतात.
परंतू आम्ही मानतो की,प्रत्येक विश्वासू आपल्या पुढाऱ्यावर निर्भर न राहता त्यांनी परमेश्वरावर अवलंबून राहण्यास शिकले पाहीजे. पुढाऱ्यांनी नेहमी उत्तर देताना पवित्रशास्त्राच्या द्वारेच उत्तर दिले पाहीजे, परमेश्वर त्याच्या जीवनात कशा प्रकारे कार्य करीत आहे हे त्यांना सांगणे आहे. लक्ष हे आहे की, प्रत्येक विश्वासणाऱ्यांना याची जाणीव व्हावी की,पवित्रशास्त्र हे त्यांच्या जिवनासाठी मार्गदर्शक आहे आणि परमेश्वरा बरोबर त्यांचे संबध दृढ करण्यास मदत करते.

**स्वरूप :-**

- आराधना / सुरवातीची प्रार्थना
- समुहाची (गटाची) वेळ - आठवडयातून वाचलेल्या शास्त्रभागावर उत्तरासाठी चर्चा करणे.अधिक माहीतीसाठी ''प्रेरीत करणारा गट'' या भागामध्ये पाहणे.

- शिक्षणची वेळ - ज्या शास्त्रभागा विषयी ज्या गटाने एकवेळ त्या आठवडयात चर्चा केली असेल तेव्हा त्या गटाचा पुढारी त्या आठवडयातील शास्त्रभागावर शिक्षण देऊ शकतो. त्या आठवडयातील सहा दिवसाचा अभ्यासक्रम त्याला प्रवचन देण्यास मदत करील. पण हे लक्षात ठेवणे की, शास्त्रभागातील अध्ययनावर लागूकरण करणे आवश्यक आहे.

- समापनाची प्रार्थना करणे आहे.

**प्रेरित करणारा समुह (गट)**

- जेव्हा समुहातील लोक एकत्रीत येतात तेव्हा गटाच्या पुढाऱ्याने ती वेळ आनंददायी बनविण्ययासाठी प्रयास केला पाहीजे. ही पुढाऱ्याची जबाबदारी आहे. त्याने गटातील सर्वांना मदत करून त्यांना चर्चेमध्ये सामील करून घेतले पाहीजे.

- एकमेकांनी एकमेकांकडे लक्ष द्यावे यासाठी गटाने गोलाकारात बसले पाहीजे.

- वेळेचे ध्यान ठेवून सर्व प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे.प्रत्येक प्रश्नाचे वाचन करीत असताना मोठया आवाजात आणि स्पष्टपणे बोलणे. प्रत्येक प्रश्नांची अनेक उत्तरे देण्यासाठी प्रत्येकाला संधी देणे, जो पर्यंत त्या प्रश्नाचे उत्तर बरोबर (योग्य) येत नाही. जर प्रश्न संपत नाही तर गटातील सर्वांनी मिळून पुर्ण करण्याचा प्रयत्न करणे. प्रश्न अर्ध्या भागामध्ये (अर्ध्या गटामध्ये) वाटून घेणे कारण तुम्ही पंधरा मिनिटा नंतर कोठे होता हे समजेल.

- आपण एकमेकांपासून शिकत आहोत असे म्हणून सुरवात करणे कारण परमेश्वर आपल्याला आपल्या घरात आपल्या प्रश्नांची उत्तरे देतो. गप्प राहणाऱ्या विश्वासणाऱ्याला सोपे प्रश्न विचारून त्याला प्रोत्साहित करणे.(सोप्या आणि कठीण प्रश्नांची यादी अगोदरच तयार करणे.) अधिक बोलणाऱ्या विश्वासणाऱ्यांना प्रार्थना करण्यास सांगणे आणि सर्वांनी त्यांच्यामध्ये सहभागी व्हावे. आणि कमी बोलणाऱ्यांना प्रात्साहित करावे.

- एकमेकांच्या नजरे द्वारे संपर्क साधून चांगल्या प्रकारे ऐकण्यास शिकणे. जर ते व्यक्तीगत प्रश्न सांगत नसतील तर प्रथम आपले उत्तर सांगा कारण दुसरे लोक उत्साहीत होतील.

- लक्षात ठेवणे की, आपण सर्वजण आत्मिक जिवनाच्या यात्रेमध्ये वेगवेगळया जागेवर आहोत. प्रश्नाचे उत्तर प्राप्त करण्याअगोदर प्रश्नाचे प्रतिस्पर्धी होण्याचे शक्यतो टाळण्याचा प्रयत्न करणे.काही लोक सर्व प्रश्नांची उत्तरे देतील पण काही लोक एक किंवा दोनच प्रश्नांची उत्तरे देतील. लक्ष हे आहे की, प्रत्येक विश्वासणाऱ्याने प्रत्येक दिवशी परमेश्वराच्या वचनामध्ये वेळ व्यतीत करावा  तसेच प्रत्येंक दिवशी प्रार्थने मध्ये सुद्धा वेळ व्यतीत करावा, हाच उद्देश आहे.

- काही वेळा गटाने एकत्रीत मिळून प्रार्थना करणे. प्रार्थने मध्ये सहभाग महत्वाचा आहे. प्रार्थने मध्ये काही खाजगी गोष्टी गोपनिय ठेवाव्या. आपले लक्ष हे आहे की, आपण बंधू आणि बहिणी एकत्र मिळून आपल्याला स्वर्गीय पित्याजवळ जाणे आहे, आणि हे जाणून घेणे आहे की,पिता आपली चिंता करतो आणि प्रार्थनेचे उत्तर देतो. प्रत्येक सदस्यांना या वेळी आणि आठवडयाच्या दरम्यान एक दुसऱ्यांसाठी प्रार्थना करण्यास प्रोत्साहित करणे.

**समापन -**

प्रिय बंधू आणि बहिणी

जसे की आपण या यात्रेमध्ये सर्व मिळून चालत आहोत. मी प्रार्थना करते की, आपणाला प्रभूची खोली आणि त्याच्या ज्ञानामध्ये त्याने आपली वृद्धी करो. आपण आपला निर्माणकर्ता परमेश्वर याच्या बरोबर जवळीकतेचा अनूभव करू शकतो आणि त्याच्या बरोबर जसे त्याला पाहीजे तसे चालू शकतो. आपण एकच मस्तक अर्थात येशू ख्रिस्तामध्ये अधिन होऊन एक देहाच्या रूपात कार्य करण्यास शिकणे. आपण आपले पाचारण ओळखून ते पुर्ण करण्याचा प्रयत्न करणे.की, सर्व जातीच्या लोकांना सुवार्ता सांगणे आणि त्यांना शिष्य बनविण्याचे कार्य सूरू ठेवणे.

मी तुमच्या प्रत्येकासाठी प्रार्थना करीत आहे.आपण आपला मुख्य मेंढपाळ याचे पालन करावे, आणि आपण त्याच्याकडून नम्रपणे शिकावे, कारण आपण त्याच्या कळपाचे नेतृत्व करीत आहोत.

येशू मध्ये आपली बहीण

patti